**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क. 677/2022 मधील नि.1 वरील आदेश</u>**
**सिताबाई सुरवसे <u>व ईतर विरुध्द निरंक</u>**
**[<u>CNR NO. MHBIO800-1577-2022</u>]**

1. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन 1827 चे कलम 2 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

2. **<u>अर्जदारांच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.</u>**

सुरुवातीला सदरचा अर्ज अर्जदार क.1 ते 4 यांनी दाखल केला होता. प्रकरणातच्या सुनावणीदरम्यान अर्जदारांनी नि.क.14 वर अर्ज देवून मयताच्या वारसांमध्ये मुलींची नावे वाढविण्याबाबत अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज मंजूर करण्यात आला, त्यानुसार अर्जदार क. 1 ही मयत लक्ष्मण निवृत्ती सुरवसे यांची पत्नी असुन अर्जदार क. 2/अ ही मयताची सुन (मयताचा मयत मुलगा अर्जदार क.2 गोरख लक्ष्मण सुरवसे यांची पत्नी), अर्जदार क.2/ब, 2/क, 2/ड हे मयताचे नातु, अर्जदार क.3 व 4 ही मयताची मुले आणि अर्जदार क.5 व 6 या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयत लक्ष्मण निवृत्ती सुरवसे यांचा मृत्यू **दि. 05.11.2012** रोजी झालेला आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, अशी विनंती केली आहे.

3. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी दि. 24.10.2022 व दि. 14.02.2023 रोजी दै. माजलगाव टाईम्स (नि.क.09 व 26) या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. तसेच तहसील कार्यालय, माजलगाव व ग्रामपंचायत कार्यालय, शेलापूरी (नांदूर.), ता.माजलगाव येथे देखील जाहीर प्रगटन डकविण्यात आले होते, परंतु कोणीही आजपर्यंत आक्षेप नोंदविला नाही.

4. अर्जदारांतर्फे अर्जदार क.4 बालासाहेब लक्ष्मणराव सुरवसे यांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क.21), ग्रामपंचायत कार्यालय, शेलापूरी (नांदूर.), ता.माजलगाव यांनी दिलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क.27, अर्जदार क. 1 ते 6 यांचे आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती, मयताचा मुलगा गोरख लक्ष्मण सुरवसे यांचे वारस प्रमाणपत्राची प्रत, तसेच अर्जदार यांचे पेपरमधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत नि.क.09 व 26, जाहिरनामा बजावल्याबाबतचा गोषवारा नि.क.6 व 23 अशी कागदपत्रे दाखल केली आहेत, जी अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय आहेत.

5. अर्जदारांच्या वारसाबद्दल कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे अर्जदार क्र. 1, 2–अ ते 2–ड, 3 ते 6 हे मयत लक्ष्मण निवृत्ती सुरवसे यांचे वारस असल्याचे दिसुन येत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

1) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

2) अर्जदार क्र. 1, 2–अ ते 2–ड, 3 ते 6 हे मयत लक्ष्मण निवृत्ती सुरवसे यांचे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करण्यात येते.

3) आवश्यक ती कोर्ट फिस दिल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RANjANA SUKHDEV GOSAVI
Date: 2023.03.27 16:58:15 +0530

दिनांक : 27.03.2023. **( सौ.आर.एस.गोसावी )**
ठिकाण : माजलगाव. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माजलगाव.

CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Dictated on : 27.03.2023.

Transcribed on : 27.03.2023.

Checked & signed on : 27.03.2023.

Sd/-

Date: 27.03.2023.

S.M.Mandavkar

Stenographer-Gr-III

2nd Jt. Civil Court J.D.Majalgaon.